विद्याविकास

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

स्वरंग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**डॉ. संतोष परचुरे**
**संचालक**


संदर्भ क्र. विविमं/२०२१–२२/४०५ <u>अत्यंत तातडीचे व कालमर्यादेचे</u> दिनांक : १५/०६/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक / मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग.

विषय : दिव्यांग विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची आणि त्यांच्या सोयी–सुविधाबाबतची माहिती.
संदर्भ क्र. : शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे युएनआय/संकीर्ण/(९७/२२)/ विशि ६४४८, दिनांक १५/०६/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये शासनाने दिव्यांग विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची माहिती आणि दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या सोयी–सुविधांबाबतची माहिती अत्यंत तातडीने व सर्वप्राथम्याने शासनास सादर करण्याबाबत निर्देशित केले आहे. याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व अवलोकनार्थ सोबत जोडले आहे.

त्यानुसार या प्रकरणी आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागात खालील दिलेल्या दिव्यांगाच्या प्रकारनिहाय विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी नाव, मोबाईल क्रमांक, ई–मेल आयडी अशी माहिती आणि त्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सोयी व सवलतीची माहिती <u>पुढील लिंकवर (www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Disability/Accessibility – Disability/Accessibility Information)</u> <u>येथे **दिनांक १७ जून, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राधान्याने** पाठविण्यात यावी</u>. सदर माहिती भरताना सुलभ संदर्भासाठी सोबतचा तक्ता पाहावा.

| Types of Disabilities as per RPWD Act 2016 | | | |
|---|---|---|---|
| ०१ | Blindness (पूर्णत: अंध) | १२ | Chronic Neurological conditions (मज्जासंस्थेचे तीव्र आजार) |
| ०२ | Low vision (अंशत: अंध) | १३ | Specific Learning Disabilities (अध्ययन अक्षम) |
| ०३ | Leprosy cured person (कुष्ठरोग निवारित) | १४ | Multiple Sclerosis (बहुविध द्दधन अपदयरर) |
| ०४ | Hearing Impairment (कर्णबधिर) | १५ | Speech and Language disability (भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व) |
| ०५ | Locomotor Disability (लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह) | १६ | Thalassemia (थॅलस्सेमिया) |
| ०६ | Dwarfism (शारिरीक वाढ खुंटणे) | १७ | Hemophilia (हिमोफिलिया) |
| ०७ | Intellectual disability (बौद्धिक अक्षम(मतिमंद/गतिमंद)) | १८ | Sickle Cell disease (सिकल सेल आजार) |
| ०८ | Mental Illness (मानसिक आजार) | १९ | Multiple Disabilities including deafblindness (बहुविकलांग) |
| ०९ | Autism Spectrum Disorder (स्वमग्न) | २० | Acid Attack victim (ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम) |
| १० | Cerebral Palsy (सेरेब्रल पाल्सी) | २१ | Parkinson's disease (पार्किंसन्स आजार) |
| ११ | Muscular Dystrophy (स्नायुंची विकृती) | | |

सदरचा विषय हा अत्यंत तातडीचा असून सदर माहिती राज्य शासनाकडे निर्गमित करावयाची असल्याने दिव्यांगाच्या प्रकारनिहाय **विद्यार्थी** (पात्रता क्रमांकाच्या (Eiligibility No.)मदतीने), **शिक्षक** (पॅन कार्ड क्रमाक (Pan Card No.)/शिक्षक युनिक आयडीच्या मदतीने), **शिक्षकेतर कर्मचारी** (पॅन कार्ड क्रमाकांच्या मदतीने (Pan Card No.) मदतीने) नाव, मोबाईल क्रमांक, ई–मेल आयडी अशी माहिती आणि त्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सोयी व सवलतीची माहिती विद्यापीठाच्या उपरोल्लेखित लिंक वर *दिनांक १७ जून २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राधान्याने भरण्यात यावी.*

दिव्यांगाच्या प्रकारनिहाय माहिती वेळेत पाठविणे अत्यंत आवश्यक असून ही बाब सर्वप्राथम्य मानून याबाबतची पूर्तता कालमर्यादेत करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

ऑनलाईनबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०–७१५३३६३३

Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in

विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०/८१

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

web-www.dhepune.gov.in, E-Mail : vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९

क्रमांक.युएनआय/संकीर्ण/(९७/२२)/विशि ६४५२ दिनांक.१५.०६.२०२२

15 JUN 2022

**अत्यंत तातडीचे/सर्वप्राथम्य**

प्रति,

कुलसचिव,

सर्व अकृषी विद्यापीठे

**विषय : Maharashtra State University of Disability Studies & Rehabilitation Science MSUDSRS स्थापन करणेबाबत...**

**संदर्भ : शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.६६/विशि-४, दि.१४.०६.२०२२**

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राचे अवलोकन व्हावे. सदर पत्रान्वये मा.राज्यमंत्री, श्री. ओमप्रकाश कडू यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेल्या दि.३.६.२०२२ च्या पत्राची प्रत पाठविण्यात येत असल्याचे कळवून, सदर पत्रान्वये राज्यामध्ये दिव्यांग विद्यापीठ (Maharashtra State University of Disability Studies & Rehabilitation Science MSUDSRS) स्थापन करण्याच्या अनुषंगाने आवश्यक मान्यता देण्याची विनंती करण्यात आली असल्याचे नमूद केले आहे.

दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणून त्यांचेसाठी नोकऱ्यांची संधी निर्माण करणे आवश्यक असल्याने व त्यांच्या भविष्याचा विचार करुन महाराष्ट्र राज्यात १०० एकर जागेमध्ये Maharashtra State University of Disability Studies & Rehabilitation Science (MSUDSRS) स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच भारत सरकारने आसाममधील कामरुप येथे यासंदर्भात राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्याची कार्यवाही सुरुफ केल्याचे नमूद केले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्यात दिव्यांग विद्यापीठ स्थापन करण्याबाबतची विनंती उपरोक्त पत्रान्वये करण्यात आली आहे.

राज्यातील विद्यापीठांमध्ये सद्यसिथतीत दिव्यांग विद्यार्थ्यांची विद्यापीठनिहाय संख्या, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध चे विशेष अभ्यासक्रम, उपलब्ध शैक्षणिक सोई-सुविधा, शिक्षण व नोकरीतील संधी, त्यासाठी कार्यरत विभाग यामधून कार्यरत असलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्याबाबत तसेच विद्यापीठ स्थापन करावयाचे झाल्यास त्यासाठी आवश्यक मान्यतांबाबतचा तपशील, जमीन, इमारत, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पयाभूत व अन्य सुविधांची आवश्यकता, अभ्यासक्रम, विद्यापीठाचे स्वरुप आणि स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणे व्यवहार्य व उचित होईल किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

तरी शासन पत्रानुसार आपले विद्यापीठ व विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सलग्नित अनुदानित व विना अनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांबाबची माहिती सोबतच्या विवरणपत्रामध्ये **दोन दिवसांत संचालनालयास सादर करावी.**

(सुयश दुसाने)

प्रशासन अधिकारी

शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,

महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा.अजित बाविस्कर, उप सचिव, विशि-४, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.

Scanned with CamScanner

विवरणपत्र-१

शासन निर्णय दिनांक.०४ मार्च २०१७ मध्ये नमूद केलेल्या दिव्यांगत्वाच्या २१ प्रकारची वर्गवारी नमूद केलेली आहे. त्यानुसार २१ प्रकारच्या दिव्यांगत्वाची खुद्द विद्यापीठ व संलग्नित अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालयातील दिव्यांगत्वाच्या वर्गवारीनिहाय अचूक विद्यार्थी संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | दिव्यांगत्वाचा प्रकार | विद्यापीठातील विद्यार्थी संख्या | संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | अनुदानित | विना अनुदानित/कायम विना अनुदानित | |
| १ | पूर्णत: अंध | | | | |
| २ | अंशत: अंध | | | | |
| ३ | कुष्ठरोग निवारीत | | | | |
| ४ | कर्णबधीर | | | | |
| ५ | लोकोमोटरडिसेबिलिटी अस्थिव्यांगासह | | | | |
| ६ | शारिरीक वाढ खुंटणे | | | | |
| ७ | बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) | | | | |
| ८ | मानसिक आजार | | | | |
| ९ | स्वमग्न | | | | |
| १० | सेरेब्रल पाल्सी | | | | |
| ११ | स्थायूंची विकृती | | | | |
| १२ | मज्जासंस्थेचे तीव्र आजार | | | | |
| १३ | अध्ययन अक्षम | | | | |
| १४ | बहुविध दृधन अपदयर | | | | |
| १५ | भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व | | | | |
| १६ | थॅलेस्सेमिया/कॅन्सर | | | | |
| १७ | हिमोफिलिया | | | | |
| १८ | सिकल सेल आजार | | | | |
| १९ | बहुविकलांग | | | | |
| २० | ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम | | | | |
| २१ | पार्किसन्स आजार | | | | |

Scanned with CamScanner

विवरणपत्र-२

शासन निर्णय दिनांक.०४ मार्च २०१७ मध्ये नमूद केलेल्या दिव्यांगत्वाच्या २१ प्रकारच्या वर्गवारीनुसार दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध चे विशेष अभ्यासक्रम, त्यांना उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सोई-सुविधा, शिक्षण व नोकरीतील संधी - यासाठी कार्यरत असलेले विभाग व त्यामधून कार्यरत असलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती.

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

Scanned with CamScanner